# वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महामेट्रो तर्फे उपाय योजना

- पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट या पहिल्या मार्गिकेवर सहयोग केंद्र व 'क्विक रिस्पॉन्स टीम' कार्यान्वित

पुणे, १३ नोव्हेंबर, २०१७ : महा मेट्रोच्या वतीने पिंपरी चिंचवड परिसरात होत असलेल्या मेट्रो प्रकल्पासाठी सध्या वेगाने काम सुरू आहे. प्रकल्पाअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते दापोडी येथील हॅरीस पूल दरम्यान सध्या व्हायाडक्टचे काम सुरू असून यामुळे वाहतुकीवर काही प्रमाणात परिणाम होत आहे. या कामामुळे होत असलेली वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महामेट्रोच्या वतीने उपाययोजना करण्यात आल्या असून यासंदर्भातील माहिती महामेट्रोचे कार्यकारी संचालक रामनाथ सुब्रमण्यम् यांनी कळविली आहे.

वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी नाशिक फाटा ते खराळवाडी दरम्यान मुंबईकडे जाणा-या ग्रेडसेप्रेटराच्या दोन्ही लेन सकाळी ११ ते सायंकाळी ५ पर्यंत व रात्री ११ ते पहाटे ५ पर्यंत बंद राहतील. इतर वेळी एक लेन ही वाहतुकीसाठी खुली राहील. तसेच पुण्याकडे येणारी ग्रेडसेप्रेटरची एक लेन ही कायम खुली राहणार आहे. याशिवाय सीएमई ते नाशिक फाटा ग्रेडसेप्रेटरची पुण्याकडे व मुंबईकडे जाणारी एक- एक लेन ही वाहतुकीसाठी कायम खुली राहणार असून जड वाहनांनी सर्व्हिस रस्त्याचा जास्तीच जास्त वापर करावे असे आवाहनही यावेळी करण्यात आले आहे.

प्रत्येक स्ट्रेचच्या सुरुवातीला मोठे एलईडी फलक व इलेक्ट्रॉनिक फलक लावण्यात आले असून खडकी सिग्नल ते नाशिक फाटा व निगडी तेहॅरीस पूल पर्यंत मराठी व इंग्लिशमध्ये दिशादर्शक फलकही लावण्यात आले असल्याची माहिती कळविण्यात आली आहे.

याबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे २, खराळवाडी येथे २, नाशिक फाटा येथे ३, दापोडी पूल (सीएनजी पेट्रोलपंप) येथे ३, मेगामार्ट येथे २, सीएमई सिग्नल येथे ३ असे एकूण दिवसभर १५ व रात्री १५

असे एकून ३० मार्शल या ठिकाणी तैनात असतील. याव्यतिरिक्त वरील सर्व ठिकाणी पुणे शहर वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी नेमण्यात आले असून पुणे मेट्रोच्या वतीने एक निवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त व २ सहाय्यक पोलिस निरिक्षक यांची नेमणूक करण्यात आली आहे.

एक 'क्विक रिस्पॉन्स टीम' (क्यूआरटी) देखील याठिकाणी तैनात असेल. ज्यामध्ये गस्त घालण्यासाठी एक 'पेट्रोलिंग व्हेइकल' असून त्यावर माजी पोलीस अधिकारी मेट्रोकडून तैनात करण्यात आले आहेत. याद्वारे ज्या हद्दीत पुणे मेट्रोचे काम सुरू असेल तेथे वाहतुकीला कोणताही अडथळा येणार नाही आणि वाहतूक सुरळीत सुरू राहील यासाठी ही टीम प्रयत्नशील असेल. जर या ठिकाणी काही अडथळा आला तर याबद्दल सदर टीम कॉल सेंटरमधील अधिका-यांना कळवून त्या अडथळ्या संबंधी आगाऊ माहिती तत्परतेने संबंधित अधिका-यांना देईल. अशा पद्धतीची यंत्रणा ही 'रिच १' अर्थात पिंपरी चिंचवड ते स्वारगेट मार्गिकेवर उपलब्ध करून देण्यात आली असून लवकरच ती वनाझ ते रामवाडी या मार्गिकेवर देखील उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

वनाझ ते रामवाडी या रिच २ च्या दुस-या मेट्रो मार्गिकेसाठी १२ मार्शल्स तैनात असणार असून यापैकी ६ मार्शल्स हे दिवसा, तर ६ मार्शल्स हे रात्री तैनात असतील. या मार्शल्सवर प्रत्येकी १ याप्रमाणे २ सुपरवायझर्स असणार असून यापैकी एक रात्री तर एक दिवसा उपलब्ध असेल. याशिवाय २ निवृत्त पोलीस अधिकारी हे रिच २ च्या काम सुरू असलेल्या आनंदनगर ते आयडिअल कॉलनी या १ किमीच्या पट्टयात तैनात केलेले असतील.

सदर मार्गावर काम सुरू असताना पुणे मेट्रोच्या वतीने लोखंडी बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत तसेच रोप लाईट्स, ब्लिंकर्स व फ्लड लाईट्स देखील बसविण्यात आले आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट या मेट्रोच्या पहिल्या मार्गिकेवर वल्लभनगर, एसटी स्टॅण्डमागे सहयोग केंद्र आजपासून सुरू करण्यात आले असून मेट्रो प्रकल्पाविषयी नागरिकांना अधिक माहिती या ठिकाणी उपलब्ध होऊ शकेल. या व्यतिरिक्त १८००२७०५५०१ हा टोल फ्री क्रमांक देखील खास पुणे मेट्रोसाठी सुरू करण्यात आला आहे. काही समस्या आल्यास अथवा माहिती हवी असल्यास नागरिकांनी या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन रामनाथ सुब्रमण्यम् यांच्याकडून करण्यात आले आहे. हा संपर्क क्रमांक प्रत्येक बॅरिकेडवर व मोक्याच्या ठिकाणी लावण्यात येणार आहे.

रामनाथ सुब्रमण्यम
कार्यकारी संचालक
महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड